लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : गुरुवार - २७ जुलै २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - ११९
पाने - ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये

लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक
ऑगस्ट महिन्याच्या तारखा
◀ दर मंगळवारी ▶
1 8 22 29
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर.

## त्यांच्या मते....

▣ कर्जफेड होत नाही म्हणून पुण्यात सावकारांनी कर्जदाराचे समक्ष त्याच्या पत्नीवर बलात्कार केला. - एक बातमी

☛ अशा बातम्या ऐकणे देखील आता भयावह झाले आहे.

▣ सरकारी कर्मचाऱ्यांना संरक्षण देणाऱ्या भा दं वि ३५३ अ चा वापर कर्मचारी शस्त्र म्हणून करीत आहेत तो रद्द करा. -सर्वपक्षीय आमदार

☛ कर्तव्यं न बजवणाऱ्यांना कशाला हवे संरक्षण?

▣ माझ्या तिसऱ्या कार्यकाळात भारत जगातील टॉप तीन अर्थव्यवस्था पैकी एक देश असेल. - पंतप्रधान नरेंद्र मोदी

☛ पहिल्या-दुसऱ्या कार्यकाळातील दावे खालून तीन क्रमांकावर तरी आहेत का?

▣ आ. गोपीचंद पडळकर यांच्यावर गुरुवारी विधानपरिषदेत बोलण्यास मनाई करण्याची कारवाई करण्यात आली आहे. - एक बातमी

☛ अजित पवार सत्तेत आल्यापासून पडळकर इतर वारी तरी बोलले आहेत का?

# महिला सक्षमीकरण, जलव्यवस्थापन क्षेत्रात काम करायला अधिक आवडेल

## - नूतन जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर-घुगे




लातूर : मी, मराठवाड्याच्या मातीतीलच आहे. लातूर जिल्हा कृषी शिक्षणाच्या बाबतीत 'माहिर' आहे! लातूर जिल्हाधिकारी म्हणून मला संधी मिळाली, याबद्दल शासनाचे आभार मानून मला महिला सक्षमीकरण आणि जलव्यवस्थापन क्षेत्रात काम करायला आवडेल अशी भूमिका जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज पत्रकार परिषदेत मांडली.

जिल्हाधिकारी म्हणून रूजू झाल्यानंतर आज त्यांनी पहिल्यांदाच पत्रकार परिषद घेऊन पत्रकारांची ओळख करून घेतली. लातूरसारख्या जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी म्हणून काम करणे आव्हान असले तरी मी आनंदी आहे. पत्रकारांना, नागरिकांना भेटणे त्यांच्या सूचना, समस्या ऐकून घेणे यावर आपला भर राहणार आहे. जिल्हाधिकारी म्हणून काम करित असताना निवेदन स्वीकारणे, लोकांचे प्रश्न समजून घेणे यासाठी तर जिल्हाधिकारी हे पद आहे. नागरिक कधीही प्रशासकीय पातळीवरील प्रश्नांसाठी संपर्क साधू शकतात. आपण लवकरच लोकांच्या प्रश्नांसाठी 'व्हॉटस्‌ॲप' चालू करार असून त्यानुसार समस्यांचे निराकरण करण्याचा आपण प्रयत्न करू असे जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर यांनी सांगितले.

वृत्तपत्रातून येणाऱ्या बातम्या विशेष करून निगेटिव्ह बातम्या या प्रशासन सुधारण्यासाठी आवश्यक असल्याचे नमुद करून जिल्हाधिकारी यांनी पत्रकारांनी नकारात्मक बातमी प्रसिद्ध करित असताना प्रशासनाची बाजू देखील प्रकर्षाने मांडावी अशी अपेक्षा व्यक्त केली. या पत्रकार परिषदेत बोलत असताना सौ. वर्षा ठाकूर यांनी आगामी काळात जिल्ह्यात आजादी का अमृत महोत्सव, मराठवाडा मुक्तीसंग्रामदिन निमित्ताने विविध कार्यक्रम राबविणार आहोत. जनतेने देखील येत्या गणेश उत्सवा दरम्यान मराठवाडा मुक्तीसंग्रामचे औचित्य साधून देखावे सादर करावेत असे आवाहन केले. पावसाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन विभाग दक्ष आहे. नुकत्याच जळकोट आदी परिसरात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागात पशुधन दगावले त्यांना अनुदान वाटप चालू करण्यात आले आहे, अशी माहिती दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत या पत्रकार परिषदेस लातूर जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी गोयल उपस्थित होते. याच पत्रकार परिषदेमध्ये उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुचिता शिंदे यांनी मतदार याद्या विशेष संक्षीप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची माहिती दिली. तर नवोदयचे पदाधिकारी यांनी नवोदयमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीस तीन वर्षे पूर्ण झाल्याबद्दलची माहिती दिली.

# वारंवार गुन्हे करणारे पाचजण पाच जिल्ह्यातून वर्षासाठी हद्दपार

लातूर : लातूर शहरात विशेष करून विवेकानंद चौक पोलीस ठाणे हद्दीत वारंवार गुन्हे करणे व टोळीने राहणाऱ्या पाच जणांना लातूर, नांदेड, बीड, उस्मानाबाद व परभणी या पाच जिल्ह्यातून एक वर्षासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी हद्दपार केले आहे.

हद्दपार करण्यात आलेल्यात ईश्वर गजेंद्र कांबळे (वय २१), महादेव अशोक पाटोळे (वय २२), विकी गजेंद्र कांबळे (वय २१), अजय उर्फ विजय संतोष चव्हाण (वय २२) व गोविंद रमेश शिंदे (वय २२) सर्व रा. जय नगर, लातूर यांचा समावेश आहे.

आगामी सण उत्सवाच्या अनुषंगाने जिल्ह्यात शांतता अबाधित राहावी सराईत गुन्हेगाराकडून कोणत्याही प्रकारचे गैरकायदेशीर कृत्य घडू नये याकरिता विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या टोळी मधील गुन्हेगारांना एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे.

सदर गुन्हेगारांच्या टोळीचे अभिलेख पाहता टोळी विरुद्ध जबरी चोरी, घरफोडी करणे, घरात घुसून दुखापत करणे, घातक शस्त्राने जबर दुखापत करणे, बेकायदेशीर जमावत सामील होणे, आजन्म कारावास किंवा अन्य कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेले गुन्हे करणे, शांतता भंग करणे तसेच शरीराविरुद्ध, मालाविरुद्ध चे गुन्हे करणे इत्यादी प्रकारचे एकूण सात गुन्हे पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे दाखल असून सदर टोळी कडून एखादा गंभीर दखलपात्र गुन्हा घडून मालमत्तेस किंवा व्यक्तीस धोका इजा होऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याने या टोळीला हद्दपार करण्यात आले आहे.

आगामी काळात साजरे होणारे सण-उत्सव व येणारे काळात होऊ घातलेल्या निवडणुकांचे अनुषंगाने त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ प्रमाणे कार्यवाही करून २५ जुलै २०२३ रोजी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी हद्दपारिचे आदेश पारित करून नमूद तारखेपासून सदरचे सराईत गुन्हेगार हे लातूर, नांदेड, बीड, उस्मानाबाद व परभणी या पाच जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहेत.

हद्दपार केलेल्या नमूद गुन्हेगारांना विवेकानंदचौक पोलिसांनी हद्दपार क्षेत्राचे बाहेर नेऊन सोडण्याची कार्यवाही सुरू आहे. सदरचा प्रस्ताव तयार करणे कामी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे, पोलीस अंमलदार प्रदीप स्वामी, पोलीस ठाणे विवेकानंद चौक पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले आहे.

सदर कारवाईच्या माध्यमातून गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत गुन्हेगार,उपद्रवी लोकांवर जरब बसून सराईत गुन्हेगारांची टोळी जिल्ह्यातून हद्दपार केल्यामुळे इतर गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यां गुन्हेगारांना चांगलाच दणका बसला आहे.

# काळे कपडे परिधान करून 'इंडिया'चे खासदार संसदेत

नवी दिल्ली : संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सरकारविरोधात विरोधक आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. विरोधकांच्या इंडिया आघाडीतील बहुतांश पक्षांचे खासदार आज काळे कपडे परिधान करून सभागृहात पोहोचले आणि केंद्र सरकारचा निषेध केला.

गुरुवारी सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या दालनात विरोधी पक्षांची बैठक झाली. ज्यामध्ये सभागृहाच्या कामकाजाच्या रणनीतीवर चर्चा झाली. या बैठकीत १७ पक्षांचे खासदार सहभागी झाले होते. दरम्यान, मणिपूरच्या मुद्द्यावर विरोधक चर्चेवर ठाम असून त्यासाठीच अविश्र्वास प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या बैठकीत काँग्रेस, टीएमसी, डीएमके, सीपीआय (एम), आरजेडी, एसपी, एनसीपी, एसएस, आप, सीपीआय, आययूएमएल, आरएलडी, केसी(एम), जेएमएम, जेडी (यू), आरएसपी, व्हीसीके या पक्षांचा समावेश होता.

शिवसेना (ठाकरे गट) खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. आम्ही काळे कपडे घालून निषेध करण्यासाठी आलो आहोत. आज संसदीय लोकशाहीचा गळा घोटला जात आहे. मणिपूरच्या मुद्द्यावर पंतप्रधान आपले मौन सोडत नाहीत, असे प्रियांका चतुर्वेदी म्हणाल्या. तर लोकसभेत सरकारविरोधात अविश्र्वास प्रस्ताव आणणाऱ्या गौरव गोगोई यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, पंतप्रधान मणिपूरच्या लोकांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत, देशाचा भाग जळण्याची ही पहिलीच वेळ आहे आणि पंतप्रधान केवळ भाषणात व्यस्त आहेत.

दरम्यान, बुधवारी लोकसभेत अविश्र्वास प्रस्तावावरील चर्चेला मंजुरी देण्यात आली आहे. सभापती ओम बिर्ला यांनी गौरव गोगोई यांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. या अविश्र्वास प्रस्तावावर चर्चा केव्हा आणि किती काळ होणार याबाबत लवकरच चर्चा होऊन निर्णय घेतला जाईल. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांना सतत चर्चा करण्यास सांगितले. अमित शाह म्हणाले की, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मी स्वतः देईल. मात्र, सभागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच उत्तर दिले पाहिजे, या भूमिकेवर विरोधक ठाम होते. यामुळेच मणिपूर मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी अविश्र्वास प्रस्ताव आणण्यात आला होता.

# कासारसिरशी निमित्ताने भाजपाच्या दोन आमदार समर्थकांचा मोर्चा-प्रतिमोर्चा

लातूर : राज्य सरकारने निलंगा तालुक्यातील कासारसिरशी या गावी अप्पर तहसीलदार हे पद मंजूर केल्यावरून भाजपाचे आमदार अभिमन्यू पवार व भाजपाचेच माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या समर्थकांमध्ये मोर्चा, प्रतिमोर्चाने तालुक्यातील राजकारण गाजत आहे.

निलंगा तालुक्यातील ६८ गावांचा समावेश औसा विधानसभा मतदार संघात आहे. आ. अभिमन्यू पवार यांनी कासारसिरशी येथे अप्पर तहसीलदार कार्यालयास मंजुरी आणली. याचा आ. संभाजीराव पाटील निलंगेकर समर्थकांनी निषेध करत निलंगा येथे आम्हाला कासारसिरशी अप्पर तहसील गावाशी संलग्न करू नये, अशा आशयाचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देवून अभिमन्यू पवार यांच्या पुतळ्याचे दहन केले होते. काल अभिमन्यू पवार यांच्या समर्थकांनी कासारसिरशी येथे भव्य मोर्चा काढून आम्हाला कासारसिरशी अंतर्गत अप्पर तहसीलदार कार्यालयाच्या कक्षेत ठेवावे अशी मागणी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक व मंडळ अधिकारी यांना निवेदनही दिले. कासारसिरशी येथे अप्पर तहसील कार्यालय म्हणजे कासारसिरशी तालुका निर्मितीची सुरूवात आहे असाही दावा त्यांनी केला. कासारसिरशी येथील अप्पर तहसील कार्यालयानिमित्त भाजपातील आ. निलंगेकर व आ. अभिमन्यू पवार समर्थकांत मोर्चा-प्रतिमोर्चाने तालुक्याचे राजकारण तापले आहे.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीला 'एक्सलंट' मानांकन

लातूर : दयानंद शिक्षण संस्था लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी.फार्मसी विभागाला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत केल्या जाणाऱ्या मूल्यांकनामध्ये 'एक्सलंट' हे सर्वोच्च मानांकन प्राप्त झाले आहे..

मंडळाशी संलग्नित संस्थांची गुणवत्ता निश्र्चित करण्यासाठी हे मूल्यांकन करण्यात येते. यामध्ये अध्यापन पद्धत, उपलब्ध करून दिलीजाणारी पुस्तके, निकाल, राबविण्यात येणारे शैक्षणिक व इतर उपक्रम, इंडस्ट्रिअल व हॉस्पिटल व्हिजिट्स, प्रयोगशाळा भेटी, विविध विषयातील तज्ज्ञांची व्याख्याने, व्यक्तिमत्व व उद्योजकता विकास कार्यक्रम, आदी अनेक गोष्टींचा समावेश असतो. सर्व बाबींची काटेकोर तपासणी केल्यानंतर मंडळामार्फत पाच श्रेणींमध्ये मानांकन देण्यात येते. यापैकी दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या डी. फार्मसी विभागाला एक्सलंट हे सर्वोच्च मानांकन प्राप्त झाले आहे.

यासाठी प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते आणि डी.फार्म विभाग प्रमुख प्रा. प्रकाश शिवनेचारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व गुणवत्ता मूल्यांकन : अध्यापन पद्धत, शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले.यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी कठोर परिश्रम घेतले.

महाविद्यालयास मिळालेल्या एक्सलंट श्रेणीबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललितकुमार शहा,उपाध्यक्ष रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# काशिलिंगेश्वर नगर ग्रा. पं. कडून देवीदास काळे, विलास भोसलेंचा सत्कार



लातूर : नुकतीच लातूर शहर भाजप जिल्हाध्यक्ष पदी देविदास काळे व आर्वी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी विलास भोसले यांची निवड करण्यात आली.

त्यामुळे काल काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतीचे संस्थापक निर्माते ॲड. किरण बडे यांच्या निवासस्थानी दोघांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायत मधील ॲड. प्रभाकर केदार, मनोज (मुन्ना) राजे, महादेव जमादार, आर्वी ग्रामपंचायतीचे उपसरपंच सचिन सुरवसे, ॲड. सतिष धायगुडे, ॲड. सिध्दु धायगुडे, खाजापाशा बागवान, श्रीमंत भताने, उदय गोजमगुंडे, बाळु धायगुडे, श्रीनिवास मेनकुदळे, श्रीहरी दुवे, राजाभाऊ सुर्यवंशी, ॲड. अजय रेणापुरकर, ॲड. प्रकाश काळे, ॲड. प्रविण भोसले, ॲड. विठ्ठल खाडप आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते.

# 'त्या' महिला कारकुनास न्यायकोठडी

लातूर : निलंगा येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील महिला कारकुनास लाच घेतल्याप्रकरणी न्यायालयाने न्यायकोठडी ठोठावली आहे.

दुय्यम निबंधक कार्यालय निलंगा येथील कनिष्ठ लिपीक अश्विनी दत्तात्रय जाधव यांना साडेचार हजार रूपयांची लाच स्वीकारत असताना त्यांच्याच कार्यालयात अटक केली होती. त्यांना काल न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने अश्विनी जाधव यांना न्यायकोठडी ठोठावली आहे.



# धोकादायक इमारती, पालिकेच्या नोटीसला प्रतिसाद देत नाही

लातूर : लातूर शहरात विशेष करून गावभागात अनेक जुने वाडे, इमारती आहेत. त्या कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता आहे. महापालिका प्रशासनाने संबंधीत घरावर धोकदायक इमारत अशा सूचना लावल्या असल्या तरी संबंधीत इमारत मालक पालिकेच्या नोटीसीला उत्तर देत नाहीत.

पावसाची रिपरिप चालू आहे. धोकदायक ईमारती या वस्तीत आहेत. त्यावेळीच संबंधीतांने पाडून घेणे आवश्यक असताना पालिकेच्या नोटीसीला एकानेही भिक घातली नाही. महापालिका प्रशासनाने धोकादायक इमारत पाडावे लागतील. अन्यथा त्या ईमारती निष्पाप नागरिकांचे बळी घेऊ शकतात.

# 2BHK बांधण्यासाठी कमीत कमी एवढ्या एरियाची गरज, जाणून घ्या काय सांगतात रेराचे नियम?

स्वतःच्या घराचे स्वप्न कोण पाहत नाही? जर तुम्हीही तुमचे घर घेण्याचा विचार करत असाल, तर तुमच्यासाठी परवडणारे घर म्हणजे काय यासारख्या अनेक गोष्टी जाणून घेणे महत्त्वाचे आहे? रेरा आणि कराशी संबंधित नियम काय आहेत? सामान्य भारतीय कुटुंबासाठी 2BHK घर हा एक चांगला पर्याय आहे. अशा परिस्थितीत, जर तुम्ही फक्त २इक्ध घेण्याचा विचार करत असाल, तर हे जाणून घेणे देखील खूप महत्वाचे आहे की २इक्ध साठी किती मोठे मानक आहे, जर तुम्ही स्वतः घर बांधत असाल तर तुम्हाला 2BHK बनवण्यासाठी किती एरियाची आवश्यकता आहे?

पती-पत्नी आणि दोन मुले असलेल्या कुटुंबासाठी २इक्ध घर आदर्श मानले जाते. आता तुम्हाला लक्झरी २इक्ध घ्यायचे आहे की परवडणारे ते तुमच्या बजेटवर अवलंबून आहे. २इक्ध मध्ये दोन बेडरूम, एक हॉल




आणि एक किचन असणे अनिवार्य आहे. यामध्ये स्नानगृहांची संख्या १ किंवा २ असू शकते. बाल्कनीसाठी देखील तरतूद आहे, परंतु रेरा कायद्यानुसार ते तुमच्या चटईक्षेत्रात समाविष्ट नाही.

प्रत्येक राज्याचा रेरा कायदा वेगळा असतो. म्हणून, ठएठ- नुसार, मानक 2BHK चा आकार राज्यानुसार बदलू शकतो. पण या बाबतीत जीएसटी कायदा तुम्हाला चांगली समज देतो. २इक्ध घरे बहुधा परवडणाऱ्या घरांच्या अंतर्गत येतात. जीएसटी कायद्यानुसार, जर तुमचे घर दिल्ली-मुंबईसारख्या मेट्रो शहरांमध्ये ६० स्क्वेअर मीटर (६५० स्क्वेअर फूट) किंवा त्यापेक्षा कमी असेल तर ते परवडणारे घर असेल. दुसरीकडे, बिगर मेट्रो शहरांमध्ये, ही मर्यादा ९० चौरस मीटर (सुमारे १००० चौरस फूट) किंवा त्याहून कमी असू शकते. एवढ्या भागात 2BHK देखील विकसित करता येईल.

जर तुमच्याकडे प्लॉट पडलेला असेल आणि तुम्हाला त्यावर स्वतः एक छान 2BHK बनवायचा असेल. मग हे मार्गदर्शक तुमच्यासाठी चांगले काम करू शकते. मानक आणि प्रशस्त २इक्ध मध्ये, तुमचा हॉल १२ १६ फूट असावा, तर तुमची मास्टर बेडरूम १२ १४ फूट आणि दुसरी बेडरूम १० १२ फूट असावी. त्याचप्रमाणे स्वयंपाकघरात किमान 8X10 फूट जागा असावी. तेथे दोन स्नानगृहे ६द८ फूट असावीत. हे सर्व जोडण्यासाठी, तुम्हाला एक गॅलरी देखील बनवावी लागेल जी मानक आकारात ४ x १३ फूट असावी.

अशा प्रकारे तुम्ही ७०० ते ७५० स्क्वेअर फूट क्षेत्रात छान 2BHK बनवू शकता. जर तुमचा प्लॉट मोठा असेल तर तुम्ही बाकीची जागा ओपन स्पेस म्हणून वापरू शकता. त्यात तुम्ही पार्किंगही करू शकता. आम्ही तुम्हाला सांगतो की मुंबईसारख्या शहरात, जिथे मानक 2BHK चा आकार ६०० ते ६५० स्क्वेअर फूट आहे, दिल्ली ANCR मध्ये ते ७५० ते ९५० स्क्वेअर फूट आहे.

# ११ टन सोने, १० टन चांदी, १७००० कोटी रोख, तिरुपती मंदिरातील संपत्ती जाणून तुम्हाला बसेल धक्का

तिरुमला श्री व्यंकटेश्वर हे सजावटीचे प्रेमी आहेत. वेंकण्णा यांच्याकडे मौल्यवान दागिने आणि हिरे आहेत. सर्वसामान्यांपासून ते श्रीमंतांपर्यंत, राजे-सम्राट, नवाब, ब्रिटिश राज्यकर्ते, महंत, सरदार, लोकप्रतिनिधी यांनी अनेक देणग्या,




भेटवस्तू दिल्या आहेत. टीटीडीच्या नोंदीनुसार, तिजोरीतील मौल्यवान रत्नांचे वजन ११ टन आहे. विविध बँकांमध्ये ते जमा केले आहे. त्याच बरोबर, टीटीडीने वेंकन्ना यांच्या खात्यात १७ हजार कोटी रुपयांची रोख रक्कम जमा केली आहे.

अलीकडेच TTD EO धर्मा रेड्डी यांनी वाराणसी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत वेंकन्नाच्या मालमत्तेची माहिती दिली. दरम्यान तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दररोज सुमारे एक लाखावर पोहोचली आहे. टीटीडीचे उत्पन्नही याच प्रमाणात वाढले आहे.

TTD प्रसादाची विक्री, खोल्यांचे वाटप, देणगी इत्यादीद्वारे उत्पन्न मिळवते. वाराणसी परिषदेत मालमत्तेच्या तपशिलासह टीटीडीशी संबंधित अनेक गोष्टी समोर आल्या. ढढऊने सांगितले की ते देशभरातील ७१ मंदिरांचे व्यवस्थापन करत आहे. देवतेला सजवण्यासाठी वापरलेले सोन्याचे दागिने १.२ टन किलो आणि चांदीचे १० टन असल्याचे टीटीडीने स्पष्ट केले आहे.

त्याच वेळी, टीटीडीने स्पष्ट केले आहे की आतापर्यंत १७ हजार कोटी रुपये आणि ११ टन सोने विविध बँकांमध्ये जमा करण्यात आले आहे. तसेच, तिरुमलेशच्या सजावटीसाठी दरवर्षी ५०० टन फुलांचा वापर केला जातो. ते म्हणाले की, सध्या २४५०० कर्मचारी कर्तव्यावर आहेत. मंदिरात भाविकांच्या सेवेसाठी दररोज ८०० कर्मचारी ड्युटीवर तैनात असतात. श्रीवरी मंदिरात प्रसाद बनवण्यासाठी दरवर्षी ५ हजार टन तूप वापरले जात असल्याचे टीटीडीने उघड केले आहे. टीटीडी प्रॉपर्टी लॉगमध्ये ६००० एकर वनक्षेत्र असल्याचाही उल्लेख आहे.

# गुणवत्तेसाठी सूक्ष्म नियोजन हवे

आपल्याला येत्या काही वर्षांत स्वतंत्रपणे भूमिका घेऊन शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीचा विचार करण्याची गरज आहे. जगाशी स्पर्धा करायची असेल आणि भारतीय अर्थव्यवस्थेला बळ द्यायचे असेल तर शैक्षणिक गुणवत्तेशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड करता कामा नये. त्यामुळे केंद्र सरकारचा अहवाल उणिवा दर्शित करीत असला तरी सूक्ष्म नियोजन केले तर त्यावर मात करणे फारसे कठीण नाही हेही लक्षात घ्यायला हवे. प्रगतीसाठीचे पाऊल आता पडले नाही तर भविष्यातही अंधारात चाचपडत विकासाची दिशा चालावी लागेल.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने नुकताच 'कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक' अहवाल जाहीर करण्यात आला. या अहवालातील निर्धारित निकष आणि प्राप्त गुण लक्षात घेता महाराष्ट्राची शैक्षणिक दर्जाबाबत घसरण झाल्याचे चित्र समोर आले आहे. अर्थात यावेळी देशातील सर्वच राज्यांची घसरण झाली आहे. शिक्षणात होणारी घसरण देशातील सर्वच धुरिणांना विचार करायला लावणारी आहे. एकीकडे शैक्षणिक स्पर्धा जागतिक बनत आहे. खाउजा संस्कृतीमुळे शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. जगभरात शिक्षणाची मोठी बाजारपेठ निर्माण होत आहे. आर्थिकदृष्ट्या ही शैक्षणिक बाजारपेठ येत्या काही काळात अधिक उंचावण्याची शक्यता आहे. अशावेळी आपण आपल्या देशातील पायाभूत स्वरूपाची शिक्षणाची बिजे पेरणार्या शालेय शिक्षणात पुरेशी गुणवत्ता आणू शकलो नाही तर भविष्यात देशातील एकूण शिक्षणावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे अहवालातील परिस्थिती लक्षात घेता आपल्या देशाच्या शैक्षणिक प्रवासासाठी नियोजन, कार्यवाही आणि प्रभावी अंमलबजावणीची नितांत गरज आहे. ७५ वर्षांच्या वाटचालीनंतर पहिल्या पाच श्रेणीत एकाही राज्याला स्थान प्राप्त करता येऊ नये याला काय म्हणावे? देश प्रगती करीत आहे, विकासाकडे झेप घेत आहे, असे म्हटले जात असताना त्या विकासाला अर्थ प्राप्त करून देणार्या मूलभूत शिक्षणाला अर्थ उरला नाही, तर देशाच्या विकासाला फारसा अर्थ उरण्याची शक्यता नाही. त्यामुळे आपल्याला येत्या काही वर्षांत स्वतंत्रपणे भूमिका घेऊन शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीचा विचार करण्याची गरज आहे. जगाशी स्पर्धा करायची असेल आणि भारतीय अर्थव्यवस्थेला बळ द्यायचे असेल तर शैक्षणिक गुणवत्तेशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड करता कामा नये. त्यामुळे केंद्र सरकारचा अहवाल उणिवा दर्शित करीत असला तरी सूक्ष्म नियोजन केले तर त्यावर मात करणे फारसे कठीण नाही हेही लक्षात घ्यायला हवे. प्रगतीसाठीचे पाऊल आता पडले नाही तर भविष्यातही अंधारात चाचपडत विकासाची दिशा चालावी लागेल.

भारत सरकारने सहा क्षेत्रांतील ७३ निर्देशांकाच्या आधारे देशातील सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मूल्यांकन केले आहे. त्यासाठी एक हजार गुण निर्धारित करण्यात आले आहेत. प्राप्त गुणांच्या आधारे दहा श्रेणी राज्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार ९१ टक्क्यांपेक्षा अधिक गुण असेल तर दक्ष, ८१ टक्क्यांपेक्षा अधिक उत्कर्ष, ७१ टक्क्यांपेक्षा अधिक अतिउत्तम, ६१ टक्क्यांपेक्षा अधिक उत्तम, ५१ टक्क्यांपेक्षा अधिक प्रचेष्ठा १, प्रचेष्ठा २ साठी ४१ टक्क्यांपेक्षा अधिक आणि प्रचेष्ठा ३ साठी ३१ टक्क्यांपेक्षा अधिक गुण आवश्यक आहेत. उर्वरित १० टक्क्यांची वारंवारिता लक्षात घेता आकांक्षा १ ते ३ अशा श्रेणी निश्रिचत करण्यात आल्या आहेत. पहिल्या पाच श्रेणीत देशातील एकाही राज्याचा समावेश नाही. प्रचेष्ठा २ मध्ये दोन राज्यांचा समावेश आहे. प्रचेष्ठा ३ मध्ये सहा राज्यांचा समावेश आहे.

आकांक्षा १ मध्ये १३ राज्ये, तर आकांक्षा २ मध्ये १२ राज्यांचा समावेश आहे. आकांक्षा ३मध्येदेखील ३ राज्यांचा समावेश आहे. शेवटच्या श्रेणीत मेघालय, मिझोरम आणि अरुणाचल प्रदेशचा समावेश आहे. बिहारचा अपवाद वगळता आकांक्षा २ श्रेणीत छोट्या छोट्या राज्यांचा समावेश आहे. महाराष्ट्राचा विचार करता सहाही क्षेत्रातील सरासरी लक्षात घेता अतिउत्तम श्रेणीत ४ व उत्तम श्रेणीत ३२ जिल्ह्यांचा समावेश आहे. दक्ष, उत्कर्षमध्ये एकाही जिल्ह्याचा समावेश नाही. राज्यात अध्ययन निष्पत्ती या क्षेत्रात २४० गुणांपैकी ६५.८ (शेकडा २७.४१) गुण मिळाले आहेत. यात राज्याची श्रेणी आकांक्षा १ मध्ये आहे. अर्थात नेहमी आघाडीवर असणारे केरळ, कर्नाटक या राज्यांची श्रेणीदेखील खालावलेली आहे. या क्षेत्रात राज्याने सर्वात कमी गुण प्राप्त केले आहेत.

भारत सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणात प्राप्त गुणांच्या आधारे हे गुण मिळत आहेत. या क्षेत्रातील आपले संपादनही फारसे समाधानकारक नाही. क्षेत्र दोन प्रवेशासाठीचे आहे. त्यात ६४.७ (शेकडा ८०.८७) गुण प्राप्त आहेत. क्षेत्र तीन भौतिक सुविधांसाठी १९० गुणांपैकी ७३.४ (शेकडा ३८.६३) प्राप्त आहेत. क्षेत्र चार समतेसाठीचे असून २६० गुणांपैकी २३३.४ (शेकडा ८९.७६) प्राप्त आहेत. क्षेत्र पाच शासन प्रक्रियेसंबंधी असून त्यासाठी असलेल्या १३० गुणांपैकी ७२.२ (शेकडा ५५.५३)



गुण प्राप्त आहे.

क्षेत्र सहा शिक्षक शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी १०० गुणांपैकी ७३.६ (शेकडा ७६.६) गुण मिळाले आहेत. महाराष्ट्राच्या वाट्याला एक हजार गुणांपैकी ५८३.२ (शेकडा ५८.३२) गुण प्राप्त आहेत. आपले राज्य शैक्षणिकदृष्ट्या कायम प्रगत असतानादेखील भौतिक सुविधांमध्ये मिळालेले कमी गुण हे चिंताजनक मानायला हवे. राज्याचे सर्वात कमी गुण हे दोन क्षेत्रात असून त्यापैकी अध्ययन निष्पत्ती आणि गुणवत्ता व भौतिक सुविधा या क्षेत्रात भविष्यात भरीव स्वरूपाचे काम येत्या काही वर्षांत करावे लागणार आहे. राज्याची सरासरी लक्षात घेता महाराष्ट्राची श्रेणी सातव्या क्रमांकाची आहे.

अतिउत्तम श्रेणीत असलेल्या महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांत सातारा जिल्हा आघाडीवर असून त्या जिल्ह्याने ६०० पैकी ४३० गुण प्राप्त केले आहेत. मुंबई ४२४, नाशिक व कोल्हापूरला ४२२ गुण प्राप्त आहेत. राज्यात प्रथम स्थानावर असलेल्या सातार्याला ७१.६६ टक्के गुण प्राप्त आहेत. राज्यातील २० जिल्हे हे ४०० पेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे ठरले आहेत. याचा अर्थ त्या जिल्ह्यांना दोनशे गुणांचा टप्पा पार करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. सर्वाधिक कमी गुण अध्ययन निष्पत्तीत आहेत. त्यासाठी जिल्हानिहाय अध्ययन निष्पत्तींचा विचार करून स्थानिक गुणवत्तेची जबाबदारी असलेल्या संस्थांना नियोजन करावे लागणार आहे. त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करण्याबरोबर पर्यवेक्षणदेखील प्रभावी करावे लागणार आहे. जिल्ह्यांची गुणवत्ता उंचावल्याशिवाय राज्याची श्रेणी उंचावणार नाही.

मूल्यांकनातील सहाही क्षेत्रांचा विचार करता प्रत्येक क्षेत्रात वेगवेगळ्या जिल्ह्यांची आघाडी आहे. अध्ययन निष्पत्तीच्या क्षेत्रात तीन जिल्हे अतिउत्तम असून २९० पैकी सिंधुदुर्ग जिल्ह्याने १८१ गुण मिळवत राज्यात प्रथम स्थान प्राप्त केले आहे. त्यासोबत कोल्हापूर (१८०), सोलापूर (१७८) जिल्ह्यांचा समावेश आहे. वर्गातील परिणामकारक आंतरक्रियेसाठी ९० गुण असून परभणी वगळता उर्वरित सर्व जिल्हे दक्ष श्रेणीत आहेत. मुंबई उपनगर ८८ गुण, तर मुंबईसाठी ८७ गुण मिळालेले असून हे जिल्हे आघाडीवर आहेत. भौतिक सुविधा व विद्यार्थी हक्क यात ५१ गुणांपैकी गोंदिया जिल्ह्याने ४८ गुण प्राप्त केले आहेत. चंद्रपूर जिल्ह्याने ४७ गुण प्राप्त केले आहेत. हे दोन्ही जिल्हे दक्ष श्रेणीत आहेत. प्रचेष्ठामध्ये हिंगोली हा एकमेव जिल्हा आहे.

शाळा सुरक्षितता व विद्यार्थी सुरक्षा यासाठी ३५ गुण असून महाराष्ट्रातील ३१ जिल्ह्यांनी पैकीच्या पैकी गुण प्राप्त केले आहेत हे विशेष. ३६ जिल्हे हे दक्ष श्रेणीत आहेत. डिजिटल लर्निंगसाठी ५० गुण असून मुंबई उपनगरने ३० गुण मिळवत राज्यात प्रथम स्थान प्राप्त केले आहे. अर्थात राष्ट्रीय श्रेणीत मुंबई उपनगर उत्तम श्रेणीतच समाविष्ट आहे. मुंबई, ठाणे, जळगाव हे जिल्हे प्रचेष्ठा १ मध्ये आहेत. आकांक्षा १ मध्ये गडचिरोली हा एकमेव जिल्हा असून त्या जिल्ह्याला अवघे १५ गुण प्राप्त आहेत. प्रचेष्ठा ३ मध्ये सात जिल्हे आहेत. प्रचेष्ठा २ मध्ये २४ जिल्ह्यांचा समावेश आहे.

शासकीय प्रक्रियेसंदर्भाने मुंबई उपनगरने ८४ पैकी ७८ गुण मिळवले आहेत. त्यामुळे त्या जिल्ह्याला दक्ष श्रेणीत स्थान मिळाले आहे. सातारा उत्कर्ष श्रेणीत असून त्या जिल्ह्याला ६८ गुण मिळाले आहेत. १४ जिल्हे हे अतिउत्तम, २० जिल्हे उत्तम श्रेणीत आहेत. राज्यात अनेक क्षेत्रात मुंबई उपनगर इतर क्षेत्रात आघाडीवर आहे, मात्र अध्ययन निष्पत्तीमध्ये हा १३८ गुण मिळवत सर्वात पिछाडीवर आहे. त्याचबरोबर विदर्भातील तीन जिल्ह्यांचादेखील समावेश आहे. राज्यासाठी हा अहवाल चिंताजनक असला तरी आपण कुठे आहोत हे

यानिमित्ताने समोर आले आहे. त्यामुळे वास्तव लक्षात घेऊन जिल्हानिहाय नियोजन केले गेले तर हे शिवधनुष्य पेलणे फारसे कठीण नाही. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने नियोजन करीत भूमिका घेतली तर पुढील वर्षी राज्य वरच्या श्रेणीत गेल्याशिवाय राहणार नाही. अर्थात यासाठी शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येकानेच प्रयत्न करायला हवे. राज्य सरकार मोठ्या प्रमाणावर विविध प्रयत्न करीत आहेत, मात्र येथील रिक्त पदांचे मनुष्यबळ आणि शिक्षणावरील गुंतवणूक वाढविल्याशिवाय शिक्षणात परिवर्तन करणे अवघड आहे.

– संदीप वाकचौरे

# आधी आपल्यांना मदत करा

घरातूनच समाजकार्य सुरू होत असते. घरच्यांच्या गरजा भागवून लोकांच्या गरजा, त्यांचे काही प्रॉब्लेम असतील तर ते समजून घेणे आणि ते सोडवणे हे खर्या अर्थी समाजकार्य आहे, असं मला वाटतं. हो, म्हणजे भीक मागणार्याला भीक नका देऊ, मला मान्य आहे. नाहीतर त्याला तशीच फुकट खायची सवय लागेल, पण जे कष्टकरी आहेत, मेहनत करणारे आहेत, त्यांना त्यांच्या कष्टाचे चीज होईल असे काहीतरी केले पाहिजे ना. आता मी बरोबर आहे का चूक, हेही कधी कधी व्यक्तीसापेक्ष असते.

काय करते आहेस? झाली का सगळी कामं सकाळची? झालीस का निवांत? का अजून काही करणं बाकी आहे? तुला काय बाई, बरं आहे तुझ्याकडे कामाला बाई आहे. सगळी कामं ती करीत असेल. तू आपली मस्त हातावर हात ठेवून बसत असशील. आमचं तसं नाही ना. आमची कामवाली बाई कधी येते, कधी नाही येत, कधी दांड्या मारते. मग काय सगळीच कामं आम्हालाच करायला लागतात. काय सांगणार माझी बाई गेली सुट्टीवर. काय तर म्हणे आजारी पडली. दोन दिवस येऊ नाही शकणार. मग काय तर सकाळपासून बसले धुणीभांडी, स्वयंपाकाचा पसारा घेऊन. उगवेल परवा असे म्हटली आहे, बघूया. या आजकालच्या बायांची ना फॅशनच झाली आहे, दर काही दिवसांनी सुट्टी घ्यायची. तुमच्याकडे होतो का हा त्रास? किंवा तिकडे आहे का ही फॅशन बायांनी सुट्टी घ्यायची?

अगं मीना काय म्हणतेस तू? कसली फॅशन आणि कसलं काय. आणि फॅशन कशाला म्हणायचं याला. मी तिला महिन्यात ना एक-दोन दिवस सुट्टी देते. त्यांनाही वाटतं गं बाहेर जावं मुलांबरोबर किंवा कुटुंबाबरोबर वेळ घालवावा, त्यांच्यासोबत फिरावे, नवीन नवीन त्यांनाही ठिकाणं दाखवावी. काहीतरी चांगलं खावं प्यावं. आपण जसा आपला स्वतःचा विचार करतो, तसे त्यांचे इतर आयुष्य आहे. मग ह्या सुट्टीला फॅशन का म्हणायची? मला विचारशील तर मला तर वाटतं त्यांना महिन्यातून एक किंवा दोन दिवस सुट्टी दिली गेली पाहिजे. शेवटी ती पण माणसं. त्यांना भावना नाही का? त्यांना काही इच्छा नाही का? आपल्याला पण बदलत्या फॅशनप्रमाणे वागायला आवडतं, जगायला आवडतं, छान छान राहायला आवडतं.

तसंच त्यांच्याही काही आवडीनिवडी आहेत आणि का नाही गं. का नसाव्यात? त्यांनी पण आजकालच्या फॅशनप्रमाणे राहायला पाहिजे की, सुट्टीचा आनंद घेतला पाहिजे की, असं कसं म्हणून चालेल? आपण समोरच्याला समजून घेतलं ना तर समोरचा आपल्यालाही समजून घेतो. त्याचा अगदी फायदा उचलत असतील म्हणजे गैरफायदा उचलत असतील तर ते चुकीचं, पण तो वेळ ते योग्य ठिकाणी घालवणार असतील तर काही हरकत नाही. त्यांच्यादेखील काही गरजा असतात गं. हे काम झाल्यानंतर बायांना घरातला एक सदस्यच बोलून जातात. त्यांचा लगेच पगारच कट करणं मला नाही पटत बाई.

हे असे संवाद आपण वारंवार ऐकत असतो किंवा आपणही कोणाशी करीत असतो, पण खरंतर आपणही सगळ्यांना समजून घेतलं पाहिजे. तर काहींना सवय असते भाजी बाजारात किंवा लोकल मार्केट म्हणतो ना आपण तिथे उगीचच भाव करायची. म्हणजे बार्गेन करायची हो. उगाचच त्या भाजी बाजारात हुज्जत घालत बसतो. भाजी एवढी महागच का दिली, याची क्वालिटी तशी का, ती पुढची माहिती आहे, इतके कमी पैसे घेते, तिकडे गेले तर एवढ्या पैशात मिळू शकते, तू काही फारच महाग विकतेस, काहीतरी पैसे कमी कर नाहीतर मी नाही घेणार तुझ्याकडून पुढच्या वेळी भाजी आणि फळं पण.

मी त्या पलीकडच्या दुकानातून घेत जाईन हंया अशा प्रकारच्या संवादाची जणू फॅशन झाली आहे, पण काय करणार? असतात काही काही लोक. खरंतर ना असेच लोक जेव्हा मॉलमध्ये वगैरे जातात त्यावेळी अगदी महागाच्या दुकानातून म्हणजे ब्रॅण्डेड गोष्टी खरेदी करण्यात त्यांना फार रस असतो बरं का, पण भाजी बाजारात मात्र खूप वाद घालताना, बाई नाही आली म्हणून तिच्याशी हुज्जत घालताना नेहमीच आपल्याला दिसतात आणि काही लोक यातली बाकी ठिकाणी म्हणजे उगाचच समाजकार्य करताना दिसतात. म्हणजे रोजच्या व्यवहारातील किंवा रोजच्या आयुष्यातील जे लोक समोर असतात त्यांना मदत करण्यापेक्षा समाजकार्य करण्यातच त्यांना फार जोर असतो.

खरंतर ना म्हणजे माझं अगदी पर्सनल मत बरं का की रोज तुमच्या आयुष्यात येणार्या लोकांनाच तुम्ही थोडी थोडी मदत केली ना म्हणजे बाईच्या भावना समजून घेणे, तिची परिस्थिती समजून घेणे, तिला योग्य वागणूक देणे, तर तेही एक समाजकार्य आपल्या हातून घडते. गरज नसताना मोठ्या मोठ्या मॉलमधून किंवा ब्रॅण्डेड दुकानातून नुसतीच खरेदी करीत रहाण्यापेक्षा छोट्या छोट्या गोष्टींमध्ये म्हणजे मी म्हटलं तसं छोट्या छोट्या किंवा आपल्या जवळच्या लोकांना मदत केली तर ते खरं समाजकार्य आहे. आधी म्हटलं तसं की आधी घरच्यांना बघा. माझ्या आधीच्या लेखाप्रमाणे आधी आपल्या आसपासच बघा.

घरच्यांना बघा म्हणजे घरच्यांच्या गरजा राहिल्या बाजूलाच आणि तिसर्यांच्याच भागवत आहे, हे कुठलं समाजकार्य? त्यापेक्षा आपल्या घरातूनच समाजकार्य सुरू करूयात ना. घरच्यांच्या गरजा भागवून लोकांच्या गरजा, त्यांचे काही प्रॉब्लेम असतील तर ते समजून घेणे आणि ते सोडवणे हे खर्या अर्थी समाजकार्य असं मला वाटतं. हो, म्हणजे भीक मागणार्याला भीक नका देऊ, मला मान्य आहे. नाहीतर त्याला तशीच फुक्कट खायची सवय लागेल, पण जे कष्टकरी आहेत, मेहनत करणारे आहेत, त्यांना त्यांच्या कष्टाचे चीज होईल असे काहीतरी केले पाहिजे ना. आता मी बरोबर आहे का चूक हेही कधी कधी व्यक्तीसापेक्ष असते ना.

हो, मला माहिती आहे की हा लेख थोडासा आधीच्या लेखाला धरूनच आहे, पण काही हरकत नाही. कारण काही लोक खरोखर असंच वागतात हो. म्हणून थोडी कळकळीची विनंती की, समाजकार्य करायचं आहे ना, तर आपल्या आधी घरापासून सुरू करावे. समाजकार्य करायचं असेल ना तर आपल्या घरापासून किंवा आपल्या लोकांपासून सुरुवात करावी. आपल्या लोकांकडे दुर्लक्ष करून किंवा आपल्या समाजाशी वैर ठेवून दुसर्या समाजाचं भलं करायचं, हे कुठलं समाजकार्य? काय मग तयार आहात ना नवीन फॅशन करायला? नवीन फॅशन म्हणजे नवीन फॅशनप्रमाणे आपल्याच लोकांना आधी महत्त्व द्यायला? चला तर मग आपल्या समाजाची मदत करूया.

– अर्चना दीक्षित

# कारगिल युद्धातील सैनिकांचे शौर्य व पराक्रम प्रत्येक भारतीयांसाठी प्रेरणादायी

उस्मानाबाद : कारगिल युध्दाच्यावेळी भारतीय सैन्याने अतिशय दुर्गम उंचावरील कठिण डोंगर शिखरावर लपून बसलेल्या पाकिस्तानी सैन्याला हुसकावून लावले आणि आपला भूभाग पुन्हा ताब्यात घेतला.याचा देशाला सार्थ अभिमान आहे.आम्ही त्यांना वंदन करतो.कारगिल युद्धातील सैनिकांचे शौर्य व पराक्रम हा प्रत्येक भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन कमांडंट ग्रुप कैप्टेन प्रणब पंडा यांनी .केले.

२६ जुलै हा दिवस देशभर 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो.त्यानिमित्ताने केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयच्या केंद्रीय संचार ब्युरो, सोलापूर आणि श्री.तुळजाभवानी सैनिकी विद्यालय तुळजापूर यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित शहिदांना मानवंदना कार्यक्रमात श्री.पंडा बोलत होते.

यावेळी मंचावर क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, प्राचार्य वैजनाथ घोडके, सहायक प्रचार अधिकारी अंबादास यादव, डॉ.सुभाष पेठकर, सुभेदार मेजर जी एस सोनकांबळे, श्री.रमाकांत स्वामी, श्री. भिमा सुरवसे, श्री.रणजीत रोकडे यांची उपस्थिती होती.

कमांडंट पंडा म्हणाले,कारगिल युद्ध हे जगातील एक कठीण युद्धपैकी एक आहे.८५ दिवस चालेल्या या युद्धाचा अभ्यास करण्यासाठी अमेरिका, फ्रांस, जर्मनी, व्हिएतनाम सारख्या अनेक देशातून लोक येत असतात.अतिशय उंच असलेल्या डोंगरावर लढलेले हे युद्ध आहे. जवळपास ४ सेक्टरमध्ये हे युद्ध लढले गेले आहे.आजच्या या दिनाचा संकल्प करून विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्यामध्ये मोठ्या संख्येने भर्ती व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

श्री.चव्हाण म्हणाले,कारगिल विजयदिनाचे स्मरण करताना कॅप्टन विक्रम बत्रा आणि त्यांचे तुकडीचे योगदान हे तरुणांना देशभक्ती आणि साहस यांचे प्रतिक शिकवते.जेव्हा कॅप्टन विक्रम बत्रा एक पर्वत शिखर जिंकून परत आले.त्यानंतर त्यांचे वाक्य प्रसिध्द झाले 'ये दिल मांगे मोर ---' त्यांनी तरूणांमध्ये देशभक्तीची आग पेटवली.पुढच्या हल्ल्यात त्यांनी प्राणांचे बलिदान दिले.या हल्ल्याचे नेतृत्व त्यांनी केले होते.या सर्व शहिदांच्या शौर्याचे स्मरण करून त्यांना मानवंदना देण्याचा हा दिवस असल्याचे श्री.चव्हाण यांनी सांगितले.

श्री.घोडके म्हणाले,कारगिल विजय दिनाच्या निमित्याने घेण्यात आलेल्या स्पर्धेच्या माध्यमातून विदयार्थांना भारतीय सैन्यांनी देशासाठी केलेला पराक्रम त्यांचे धाडस,शौर्य यांचे धडे पुन्हा मिळाले आहेत.यातूनच देशभक्त सैनिक तयार होतील,अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरूवातीला ११ व १२ वी वर्गातील मुलांनी सैनिक शिस्तीमध्ये उपस्थित मान्यवरांचे हस्ते शहिदांना मानवंदना देण्यात आली. यावेळी इयत्ता ९ वर्गातील विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या परिसरातील पाना-फुलांनी बनवलेल्या पुष्पचक्राने अमर जवानांच्या प्रतिमेला मानवंदना दिली. यावेळी घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेते- सिद्धार्थ गायकवाड, प्रतिक गायकवाड, अमिर अल्लाउद्दीनशेख,संग्राम जाधव आणि चित्रकला स्पर्धेच्या लहान गटातील विजेते - सागर धवडे, वैभव कांबळे, श्री गणेश कदम,दत्तराज कोळी, मोठ्या गटातील विजेते - भारत निकम,आशिष भड, शंकर पवार, संग्राम जाधव सोबतच उपस्थित विद्यार्थ्यासाठी कारगिल युद्धावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार रमाकांत स्वामी यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्रीय संचार ब्यूरो सोलापूरचे कार्यालय सहायक जब्बार हन्नूरे,एस डी खान,श्री लोखंडे,डॉ विजय वडेवराव, देविदास पांचाळ आणि जलील हिपरगी यांनी परिश्रम घेतले.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य




## जर मुलाचे डोळे लाल होत असतील, तर व्हा वेळीच सावध, हा आहे आय फ्लूचा आजार

पावसाळ्यानंतर अचानक फ्लूच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. लहान मुलांनाही या आजाराची लागण होत आहे. पावसाळ्यातील आर्द्रतेमुळे अनेक प्रकारचे जीवाणू सक्रिय होतात, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. त्यामुळे डोळ्यांच्या फ्लूसारख्या आजारांमध्ये वाढ होत असली तरी यावेळी अधिक रुग्ण आढळत आहेत. मुलांना स्वच्छतेची काळजी घेता येत नसल्याने त्यांना हा आजार पसरण्याचा धोका जास्त असतो. अशा परिस्थितीत मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.

डॉक्टरांच्या मते, जर एखाद्या मुलाच्या डोळ्यात दुखत असेल आणि डोळे लाल होत असतील, तर हे डोळ्याच्या फ्लूचे लक्षण आहे. अशा परिस्थितीत मुलाला शाळेत पाठवू नका. याचे कारण असे की डोळ्याचा फ्लू हा जीवाणूंमुळे होणारा आजार आहे, जो एका मुलापासून दुसऱ्या मुलामध्ये पसरू शकतो.

याबाबत तज्ज्ञांनी सांगितले की डोळ्यांचा फ्लू संसर्ग एका आठवड्यात बरा होतो, परंतु काही प्रकरणांमध्ये, बॅक्टेरियाचा संसर्ग जास्त असू शकतो. अशा स्थितीत प्रतिजैविके घेण्याची गरज आहे. काही प्रकरणांमध्ये, स्टिरॉइड्स देखील द्यावे लागतील.

तज्ज्ञांच्या मते, मुलांमध्ये डोळ्यांचा फ्लू पसरण्याचा धोका जास्त असतो. कारण, मुले स्वच्छतेची काळजी घेत नाहीत. एकमेकांना स्पर्श करतात आणि हात न धुता खातात. अशा परिस्थितीत डोळ्यांचा फ्लू पसरण्याचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत पालकांना मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.

अशा प्रकारे घ्या काळजी

गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा

हात धुत रहा

डोळ्यांना स्पर्श करणे टाळा

डोळ्यांच्या समस्या असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या

फ्लू झाल्यावर या गोष्टी लक्षात ठेवा

तुमचा टॉवेल आणि रुमाल वेगळे ठेवा

कुटुंबातील इतर सदस्यांपासून स्वतंत्रपणे झोपा

दिवसातून चार ते पाच वेळा डोळे धुवावेत

डोळा दुखत असल्यास डॉक्टरांशी संपर्क साधा


## तुम्ही कॉटन बड्सने साफ करता का कान? जाणून घ्या त्याचे तोटे

पाणी, वारा किंवा धुळीमुळे कानात घाण साचू लागते. याला इअरवॅक्स म्हणतात. बरेच लोक कान साफ करण्यासाठी कॉटन बड्स वापरतात. कॉटन बड्स वापरण्याचा कल शहरी भागात अधिक आहे. पण याने कान स्वच्छ करणे योग्य आहे का? त्यांच्या वापराने खरोखरच कान स्वच्छ होतात की हानी होऊ शकते? आज हेल्थ टिप्समध्ये आम्ही तुम्हाला याबद्दल सविस्तर सांगणार आहोत.

कान स्वच्छ करण्यासाठी कॉटन बड्स वापरणे योग्य नसल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. जेव्हा कॉटन बड्स कानात टाकले जाते, तेव्हा ती घाण बाहेर काढण्याऐवजी आत ढकलतात. त्यामुळे कानात संसर्ग होण्याचा धोका असतो. यामुळे कानात गळती होऊ शकते. कॉटन बड्स कानाच्या आतील अस्तरांनाही नुकसान पोहोचवू शकतात. यामुळे ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. कानातही पुरळ येऊ शकतात.

याबाबत ईएनटी सर्जन सांगतात की कानात वॅक्स तयार होण्याची प्रक्रिया असते. हे इयरवॅक्स कानांचे संरक्षण देखील करते, परंतु जर ते जास्त प्रमाणात साठले गेले, तर ते देखील नुकसानास कारणीभूत ठरते. लोक कॉटन बड्सने कान स्वच्छ करतात, पण साफसफाई करताना आतली घाण कानाच्या कॅनल मध्येही जाऊ शकते. या कचऱ्यासोबतच धोकादायक जीवाणू कानात जाण्याचा धोकाही असतो.

हे बॅक्टेरिया कानाच्या पडद्यालाही नुकसान पोहोचवू शकतात. घाण किंवा कोणतेही जीवाणू कानात गेल्यावर अजिबात कळत नाही. काही प्रकरणांमध्ये खाज येते, परंतु लोक त्याकडे




लक्ष देत नाहीत. अशा स्थितीत घाण वाढत राहते, ज्यामुळे कानात अनेक गंभीर आजार होऊ शकतात. अशावेळी कॉटन बड्स वापरणे टाळावे. विशेषतः मुले आणि वृद्धांच्या बाबतीत, ते न वापरणे चांगले आहे.

आपल्या शरीरात स्वतःला स्वच्छ करण्याची प्रक्रिया असते. या अंतर्गत, कान देखील स्वतःला स्वच्छ करतात. तुम्ही पाहिले असेल की कधी कधी कानातून घाण बाहेर पडायला लागते आणि आतमध्ये असलेला वॅक्स बाहेर पडतो. अशा स्थितीत तुम्ही दररोज कान स्वच्छ करावेत असे नाही.

कान स्वच्छ करण्याचा उत्तम उपाय म्हणजे त्यात तेल घालणे. शेल ऑइल आणि बेबी ऑइल चांगले. कानात तेल घातल्याने आतील घाण बाहेर येते. ज्यातून तुम्ही कापडाच्या मदतीने सहज काढू शकता. याशिवाय आंघोळ करताना कान स्वच्छ करणे आवश्यक आहे. कारण आंघोळ करताना थोडेसे पाणी कानात जाते. जे धुळीच्या कणांमध्ये मिसळून घाण करते. अशा परिस्थितीत आंघोळ करताना कान स्वच्छ करणे आवश्यक आहे.

## १ दिवसात किती लिटर पाणी प्यावे?



Water in a day पाणी हे जीवन आहे. पाण्याशिवाय जीवन शक्य नाही याची जाणीव ठेवली पाहिजे. जिवंत आणि निरोगी राहण्यासाठी आपल्याला पाण्याची गरज आहे. तर जेव्हा आपल्या शरीरात पाण्याची कमतरता असते तेव्हा आपल्याला तहान लागते. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की प्रौढ पुरुषाच्या शरीरात त्याच्या एकूण वजनाच्या ६५% आणि प्रौढ महिलेच्या शरीरात तिच्या एकूण वजनाच्या ५२ टक्के पाणी असते. पाणी आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित करते, ते पचनास मदत करते.

हे सुरळीत काम करण्यास मदत करते, आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते, वजन नियंत्रणात मदत करते, रक्तातील ऑक्सिजन परिसंचरण सुधारते. शरीरात पाण्याच्या कमतरतेची अनेक लक्षणे दिसतात. जसे डिहायड्रेशनमुळे होणारा गोंधळ, डिहायड्रेशनमुळे श्वासाची दुर्गंधी येणे, लवकर थकवा येणे, लघवी कमी होणे, हृदय गती वाढणे इ.

**एका माणसाने १ दिवसात किती लिटर पाणी प्यावे?**

पुरुषांसाठी १ दिवसात सुमारे ३.७ लिटर आणि महिलांसाठी १ दिवसात सुमारे २.७ लिटर पाणी पिणे आवश्यक आहे. जर तुम्ही रोज इतके पाणी प्यायले नाही तर भविष्यात डिहायड्रेशन आणि इतर अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात.

## हे पदार्थ सोबत मुळीच खाऊ नये

Wrong Food Combinations आपण जेव्हा दोन खाद्य पदार्थांचे मिसळून खातो किंवा सोबत खातो तेव्हा हे जाणून घेणे खूप महत्वाचे आहे की या पदार्थांमुळे आरोग्याला कुठलंही हानी तर होणार नाही?

आयुर्वेदात अग्नी हा शब्द अन्नाचे पचन या अर्थाने वापरला जातो. आपल्या शरीराची अग्नी ही संतुलित राहावी, ही काळजी स्वतः घ्यावी. अशात आपली रोगप्रतिकार प्रणाली ही पण फार महत्त्वाची ठरते. असे बरेच पदार्थ असतात जे एकत्र खाणे योग्य नाही आहेत. तर चला जाणून घेऊ या त्यांचाबद्दल:-

**विरुद्ध आहार**

**आंबट फळ आणि दूध**

ज्या फळांमध्ये व्हिटॅमिन C असतं ते दुधासोबत सेवन करु नये. जेव्हा दूध आणि लिंबू किंवा



लिंबूवर्गीय फळाचे सेवन केलं जातं तेव्हा दूध गोठण्यास प्रवृत्त होतं त्यामुळे गॅस आणि जळजळ होण्याची भीती असते. यामुळे रक्तसंचय, सर्दी, खोकला, आणि ऍलर्जी देखील होऊ शकते. उदाहरण:- दूध आणि संत्र्याचा रस बरोबर किंवा लगेच घेऊ नये.

**चीझयुक्त खाद्यपदार्थ आणि कोल्ड ड्रिंक्स**

चीझ पिझ्झा आणि कोल्ड ड्रिंक ही तर जोडीचं आहे. पण हे कॉम्बिनेशन नक्कीच आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे. कोल्ड ड्रिंक्समध्ये अधिक प्रमाणात फ्रुक्टोस असतं ज्यामुळे पचनास त्रास होऊ शकतो आणि चीझमध्ये पण खूप फॅट असल्याने हे दोन्ही पदार्थ मिळून व्यक्तीचे शरीरात फॅट्सची वृद्धी करतं आणि पचनसंस्थेला कमकुवत करतं.

**समान प्रमाणात तूप आणि मध**

तूप आणि मध, आपल्या आरोग्यासाठी खूप चांगले पदार्थ आहेत. दोघांमध्ये इतर व्हिटॅमिन्स, मिनरल्स असतात पण तरी ह्यांचे सोबत सेवन करू नये. तूप आणि मध हे समान प्रमाणात मिसळल्याने एका प्रकारचे बॅक्टेरियाची उत्पत्ती होते. हा बॅक्टेरिया शरीरात अशुद्ध आणि विषारी घटक सोडतो ज्याने पोट दुखी, श्र्वसनविषयक समस्या आणि इतर विषारी समस्या उद्भवू शकतात.

**दूध आणि मासे**

आयुर्वेदाप्रमाणे दूध आणि मासे हे कॉम्बिनेशन हानिकारक होऊ शकतं कारण दुधाची तासीर शीतल असते आणि मासे उष्ण. ह्या गरम आणि थंड संयोग असंतुलन पैदा करून शरीरामध्ये रासायनिक बदलावं करू शकतात. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असल्यास हे संयोजन टाळावे.

**कार्बोहायड्रेट आणि प्रोटीन**

जेव्हा आपण कार्बोहायड्रेट किंवा स्टार्च आणि प्रोटीन (जसे की बटाटे किंवा ब्रेडसह मांस) यांचे मिश्रण खाता तेव्हा ते एकमेकांचा प्रतिकार करतात, ज्याने गॅस, गोळा येणे, जळजळ आणि पोटांसंबंधित इतर समस्या होऊ शकते. उदाहरण:- बटाट्यांमध्ये स्टार्च किंवा कार्बोहैड्रेट्स अधिक प्रमाणात असतं आणि मटणात प्रोटीन त्यामुळे ह्यांचे सेवन सोबत करु नये.

## UTI लघवी करताना ही लक्षणे दिसू लागल्यावर इंफेक्शनचा धोका असतो, जाणून घ्या कारणे



UTI म्हणजेच मूत्रमार्गाचा संसर्ग कोणत्याही व्यक्तीला होतो. जेव्हा बॅक्टेरिया गुदाशय किंवा त्वचेद्वारे मूत्र काढून टाकणाऱ्या नळ्यांपर्यंत पोहोचतात हा त्रास उद्भवतो. महिलांमध्ये यूटीआय होणे खूप सामान्य आहे. बहुतेक स्त्रियांना त्यांच्या आयुष्यात कधी ना कधी यातून जावे लागते. पुरुषांपेक्षा स्त्रियांना यूटीआय होण्याची शक्यता ३० पट जास्त असते.

त्याच वेळी हे पुरुषांमध्ये देखील विकसित होऊ शकते. वृद्ध पुरुषांमध्ये यूटीआयची अधिक प्रकरणे दिसतात. या दरम्यान त्यांना लघवी करताना जळजळ आणि वेदना जाणवू शकतात. याशिवाय वारंवार लघवी होणे, ताप येणे, लघवीमध्ये रक्त येणे, थंडी वाजणे, थकवा येणे, लघवीला त्रास होणे ही यूटीआयची लक्षणे आहेत. हे महिला आणि पुरुष दोघांमध्येही होऊ शकते. पण दोघांनाही वेगवेगळ्या कारणांमुळे णढख चा त्रास होतो. आज यात आम्ही तुम्हाला पुरुषांमध्ये यूटीआयची कारणे सांगणार आहोत.

**पुरुषांमध्ये यूटीआयची कारणे**

**डिहायड्रेशन**

डिहायड्रेशन हे देखील UTI चे एक प्रमुख कारण असू शकते. कारण जेव्हा तुम्ही कमी पाणी प्याल तेव्हा ते तुमच्या शरीराला डिहायड्रेट करते आणि शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. त्यामुळे णढख होण्याची शक्यता वाढते. कारण जेव्हा तुमच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ लागते, तेव्हा शरीर निर्जलीकरण होते. ज्यामुळे लघवीचा प्रवाह कमी होतो. यामुळे तुमच्या मूत्राशयात संसर्ग होण्याचा धोकाही वाढतो.

**फायमोसिस**

फायमोसिस या स्थितीत प्रायव्हेट पार्टवरील त्वचा घट्ट होते. त्यामुळे लघवीचे काही थेंब त्यावर किंवा त्वचेच्या आत राहतात. अशा स्थितीत त्वचेच्या आत लघवीचे थेंब हळूहळू संक्रमित होऊ लागतात. यामुळे णढख देखील होऊ शकते. तसेच यामुळे त्वचेच्या संसर्गाचा धोका देखील वाढतो. कधीकधी ही स्थिती अत्यंत वेदनादायक बनते.

**असुरक्षित संबंध**

असुरक्षित संबंध हे देखील अनेक प्रकारच्या संसर्गजन्य रोगांचे कारण आहे. अशा परिस्थितीत UTI देखील विकसित होऊ शकते. दुसरीकडे जर एखाद्या पुरुषाने संक्रमित महिलेशी संबंध ठेवले तर त्याला यूटीआय म्हणजेच मूत्रमार्गात संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते.

**न्यूरोजेनिक ब्लॅडर**

न्यूरोजेनिक ब्लॅडर ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये पुरुष मूत्राशयावरील नियंत्रण गमावतात. पाठीच्या कण्याद्वारे मूत्राशय नियंत्रित केले जाते. जेव्हा एखाद्या व्यक्तीला त्याच्या मणक्यामध्ये समस्या असते तेव्हा त्याचे ब्लॅडर पसरू शकते. या स्थितीत लघवी पूर्णपणे बाहेर काढणे खूप कठीण होते. कारण जेव्हा मूत्राशय पूर्णपणे रिकामा होत नाही, तेव्हा संसर्गाचा धोकाही वाढतो.

**बिनाइन प्रोस्टेटिक हायपरप्लासिया**

सहसा बिनाइन प्रोस्टेटिक हायपरप्लासियाची समस्या ५० किंवा त्याहून अधिक वयाच्या पुरुषांमध्ये दिसून येते. कारण अशा स्थितीत पुरुषांच्या प्रोस्टेटचा आकार वाढू लागतो. त्यामुळे लघवीचा प्रवाह थांबू लागतो. तसेच मूत्राशय पूर्णपणे रिकामे होत नाही. त्यामुळे जिवाणूंची वाढ होते आणि UTI ची लक्षणे जाणवतात.

## हे खाद्यपदार्थ व्हेरिकोज व्हेन्सच्या समस्येला तोंड देण्यासाठी फायदेशीर

Foods for Varicose Veins व्हेरिकोज व्हेन्स म्हणजे ओव्हरलोड नसा. जी तुमच्या शरीराच्या कोणत्याही नसामध्ये होऊ शकते, परंतु बहुतेकदा ही समस्या पायांमध्ये दिसून येते. अशुद्ध रक्तवाहिन्या फुगून झालेल्या गाठींचा नसा त्वचेच्या बाहेरून निळ्या दिसतात. जास्त दाबामुळे पायांच्या शिरा फुगतात. अशुद्ध रक्तवाहिन्या फुगून झालेल्या गाठींचा नसा त्वचेच्या बाहेरून निळ्या दिसतात. सुजलेल्या आणि वळलेल्या नसांना कधीकधी स्पायडर व्हेन्स म्हणतात. जिथे ही समस्या काही लोकांना अजिबात त्रास देत नाही, तर काही लोकांना यामुळे वेदना होत आहेत, तिथे याला किरकोळ समजण्याची चूक करू नका. तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. यासोबतच तुमच्या आहाराकडेही लक्ष दिले पाहिजे, चला तर मग जाणून घेऊया जर तुम्हाला व्हेरिकोज व्हेन्स असेल तर काय खावे.

**ओमेगा-३ रिच फूड**

नट्स, सीड्स, फिश आणि अंडी यात ओमेगा-३ भरपूर प्रमाणात आढळतं. ओमेगा- ३



रिच फूड खाल्ल्याने व्हेरिकोज व्हेन्सने पीडित व्यक्तीला आपली समस्या मॅनेज करणे सोपे होते.

**फायबर रिच फूड**

जर एखाद्याला व्हेरिकोज व्हेन्सची समस्या असेल तर त्याने विशेषत: फायबरयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करावा कारण पुरेशा प्रमाणात फायबर घेतल्याने पचनक्रिया बरोबर राहते आणि चयापचय गती वाढते. ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. जे वैरिकास व्हेन्सच्या समस्येचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रभावी आहे.

**हाय प्रोटीन फूड टाळा**

जर तुम्हाला व्हेरिकोज व्हेन्सचा त्रास होत असेल तर तुमच्या आहारातून उच्च प्रथिनेयुक्त अन्न आणि कर्बोदके वगळा. हंगामी फळे आणि भाज्यांना आहाराचा भाग बनवा, जेणेकरून शरीराला आवश्यक प्रमाणात जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतील.

आहारात समावेश करा

असे काही पदार्थ आहेत जे व्हेरिकोज व्हेन्सने ग्रस्त असलेल्या व्यक्तीसाठी खूप चांगले मानले जातात, जसे की-

अ‍ॅवोकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई आढळते. हे नैसर्गिक रक्त पातळ करणारे म्हणून कार्य करते आणि रक्त गोठण्यास प्रतिबंध करते.

ब्लॅकबेरी अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांनी समृद्ध आहे. जे व्हेरिकोज व्हेन्सला वाढण्यापासून रोखते आणि नसा मजबूत बनवते.

बीटरूटमध्ये असे घटक आढळतात, जे रक्तवाहिन्या उघडतात आणि ऑक्सिजनचा प्रवाह वाढवतात, ज्यामुळे ही समस्या कमी होते.



## निलगिरी तेलाचे फायदे जाणून घ्या

Benefits of eucalyptus oil निलगिरीचे तेल आरोग्यासाठी फायदेशीर आहे. सूज कमी करण्यात हे उपयोगी आहे. केसांची गळती देखील दूर होते. याचे फायदे जाणून घ्या.

१. सूज आणि वेदना कमी करण्यासाठी फायदेशीर- सूज आणि वेदना कमी करण्यासाठी आपण निलगिरी तेल वापरू शकता. या तेलात अँटी इंफ्लिमेंट्री आणि इनॉलजेसिक मिश्रण असतात. हे कोणत्याही प्रकारची वेदना कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. या साठी वेदना असलेल्या भागात दिवसातून एक किंवा दोन वेळा मॉलिश करा. वेदना आणि सूज नाहीशी होईल.

२. माऊथवॉश करा- हे तेल दात आणि हिरड्यांच्या समस्येसाठी प्रभावी मानले आहे. या तेलात अँटी-ऑक्सिडंट तोंडातील असलेल्या संसर्गजन्य जंताना नष्ट करण्यासाठी फायदेशीर आहे. याचा वापर केल्याने जंत तोंडात उद्भवत नाही. या साठी आपण पेस्टमध्ये मिसळून देखील ब्रश करू शकता.

३. सर्दी -पडसं साठी फायदेशीर -बदलत्या हंगामात सर्दी पडसं होणं सामान्य आहे. परंतु आपल्याला सर्दी पडसं जास्त प्रमाणात होत असेल तर हे तेल वापरावे. या मध्ये अँटीइंफ्लिमेंट्री, अँटिसेप्टिक गुणधर्म आढळतात. या साठी कोमट पाण्यात एक ते दोन थेंब तेलाचे घालून गुळणे केल्याने घशातील खवखव नाहीशी होते आणि या तेलाने मॉलिश केल्याने वेदना कमी होते. या तेलाची वाफ देखील घेतल्याने सर्दी पडसं मध्ये आराम होतो.

४. मुरुमांना दूर करतो- निलगिरी तेल मुरुमांनाच नव्हे तर त्वचेच्या समस्या देखील दूर करतो. जळजळ कमी करणे, जखम बरी करणे, या साठी हे तेल उपयुक्त आहे. या व्यतिरिक्त त्वचेचे संसर्ग कमी करण्यासाठी देखील हे तेल फायदेशीर आहे.

